महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१
C.I.N. No. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/ब/ No - 0089 दिनांक :- 1 JAN 2019

# परिपत्रक

**विषय** : महावितरण कंपनीतील फेब्रुवारी २०१८ ते जानेवारी २०१९ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या व झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष मेडिक्लेम योजना.

******

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कार्यरत कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियातील ०५ सदस्यांसाठी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०१५ पासून सुरु आहे.

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चा लाभ सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांना मिळावा अशी आग्रही मागणी योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी केलेली आहे. यासाठी मेडिक्लेम योजनेच्या समितीचे अध्यक्ष तथा संचालक (वित्त), म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या. यांनी निर्देशीत केल्यानुसार महावितरण कंपनीतील माहे फेब्रुवारी २०१८ ते जानेवारी २०१९ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या व झालेल्या कर्मचाऱ्यांकरीता **"हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी" रु. ३ लाखांकरीता (सेवानिवृत्त कर्मचारी व पत्नी)** अशी विशेष मेडिक्लेम योजना दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. यांच्यामार्फत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी **स्वत: वैयक्तीकपणे हफ्ता भरण्याच्या** अटीवर सुरु करण्यात येत आहे. सदर योजना **ऐच्छीक** स्वरुपाची आहे.

## हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसीची वैशिष्ठे :

- **हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी** ही **रु.३ लाखांकरीता** असून यामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी व पत्नी (१+१) असा समावेश राहील.
- महावितरण कंपनीतून **माहे फेब्रुवारी-२०१८ ते जानेवारी-२०१९** या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या व झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांनाच फक्त या योजनेत सहभागी होता येईल.
- **सदर योजनेमध्ये खालील लाभ देय राहतील.**
  - विमा कंपनीच्या माध्यमातून नियुक्त केलेल्या TPA (MD India) कंपनीच्या पॅनलवर असलेल्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यास कॅशलेसची सुविधा उपलब्ध राहील.
  - विमा राशीच्या १ % साधारण खोलीसाठी (रु. ३,०००/-) व २ % ICU करीता (रु. ६,०००/-) प्रति दिवस रुग्णालयातील उपचारासाठी खोली भाडे राहील.
  - **एकूण मंजूर विमा दाव्याच्या रक्कमेपैकी १० % रक्कम** ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास स्वत:ला भरावी लागेल.
  - रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी ३० दिवस अगोदर (Before) घेतलेले उपचार व रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर ६० दिवसांपर्यंत डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार होणारा खर्च योजनेत अनुज्ञेय राहील.
  - आयकर कलम ८० D नुसार सुट मिळेल व त्याबाबतचे प्रमाणपत्र विमा कंपनीमार्फत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागणीप्रमाणे देण्यात येईल.
- **हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी** ही **ऐच्छीक** असून, विमाधारक हयात असेपर्यंत नुतनीकरण विमा कंपनीच्या अटी व शर्तीनुसार विहीत मुदतीमध्येच करु शकतील. सबब, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी योजनेची मुदत संपण्यापूर्वी विमा कंपनीकडून नुतनीकरण करुन घ्यावे.

❖ **हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी**साठी खालील प्रमाणे विमा योजनेचा हप्ता राहील. सदर विमा हफ्ता हा वैयक्तीकपणे कर्मचाऱ्यांनी भरावयाचा आहे.

| योजनेचे नांव | विमा राशी | वयोमर्यादा | हफ्ता (वस्तु व सेवाकरासह) |
|---|---|---|---|
| हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी | रु.०३ लाखांकरीता (१+१) | सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे वय - ५८ ते ६० वर्ष पत्नीचे वय - ५६ ते ६० वर्ष | रु. १८,८४७/- |
| | | सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे वय - ५८ ते ६० वर्ष पत्नीचे वय - ४६ ते ५५ वर्ष | रु.१५,२४०/- |
| ऐच्छीक अपघात विमा योजना | रु.०३ लाख (पती व पत्नी यांच्याकरीता प्रत्येकी ) मृत्यू व कायमचे अपंगत्व | | रु. ३,८३/- |

❖ हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसीकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

- सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने प्रस्ताव पत्र स्वत: संपूर्ण भरुन देणे. (नमूना सोबत जोडला आहे.)
- प्रत्येकी दोन आयकार्ड साईझचे फोटो.
- सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या आयकार्डची छायांकित प्रत.
- पॅनकार्ड किंवा आधारकार्डची प्रत.

❖ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास **हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी** ही योजना घ्यावयाची असल्यास प्रस्ताव पत्रात संपूर्ण माहिती भरुन, विमा हफ्त्याच्या धनादेशसह **दि.१६.३.२०१९** पुर्वी प्रस्ताव दि ओरीएन्टल इन्शुरन्स कंपनीकडे खालील पत्त्यावर पाठवावा.

**दि ओरीएन्टल इन्शुरन्स कंपनी लिमीटेड,**
**मंडल कार्यालय -४,**
**अब्बास चेंबर्स, तिसरा मजला,**
**१ महात्मा गांधी रोड,**
**कॅम्प पुणे - ४११ ००१.**
**दुरध्वनी क्र. (का.) ०२०- २६१३००५२ / २६१३०५०५ / २६१३४४४९**

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या संकेतस्थळावरील **Employee Portal** अंतर्गत **Mediclaim** येथे व **RAPDRP-Infoportal-(Circular-I.R.Dept.)** येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(चंद्रशेखर येरमे)
**कार्यकारी संचालक (मासं)**
**महावितरण**

**प्रति,**
सर्व कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी, महावितरण.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. संचालक (वित्त), म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या. हॉंगकॉंग बॅंक इमारत, फोर्ट, मुंबई.
२. संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

**प्रत सस्नेह :**
सर्व संघटना पदाधिकारी

- आपणांस कळविण्यात येते की, यावर्षीच्या मेडिक्लेम योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या आग्रही मागणीनुसार सदर योजना विमा कंपनीमार्फत सुरु करण्यात येत आहे. तरी, उपरोक्त मेडिक्लेम योजना ही माहे फेब्रुवारी २०१८ ते जानेवारी २०१९ या कालावधीमध्ये होणाऱ्या व झालेल्या सेवानिवृत कर्मचाऱ्यांपर्यंत जास्तीत जास्त पोहोचवावी, जेणेकरुन त्यांना सदर योजनेचा लाभ घेणे शक्य होइल.